C-11

# विद्यापीठ अभियंता कार्यालय,
# डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

कामाचे नाव :– डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथे 35 व्या दिक्षांत समारोहाकरिता कार्यक्रमस्थळी तात्पुरत्या स्वरुपात खुर्ची, कनाती, मॅटींग, इ. व्यवस्थेसह इतर आवश्यक बाबी पुरविणे.

निविदापत्रक

C-13

## निविदा अटी व शर्ती

### भाग – १ प्रशासकीय भाग

१. दिक्षांत समारोहाच्या स्टेजमंडप, भोजनमंडप व शामीयाना इ. ठिकाणे नविन कापड लावणे अनिवार्य आहे. मंडप समितीकडुन त्याची मान्यता कापड लावण्यापुर्वी घ्यावी.

२. मंडप उभारणीचे काम हे काम सुरु करण्याचे आदेश दिल्यापासुन दिनांक 27.10.2021 च्या सांयकाळी 5.00 वाजेपर्यत पुर्ण करुन द्यावे लागेल अन्यथा कत्रांटदार रु. 2000/– प्रति तास दंडास पात्र होईल.

३. कंत्राटदाराने सादर केलेले दर हे सर्वकर, जसे सेवाकर, मजुरी, साहित्यहाताळणी, वाहतुक, तुटफुट, नुकसान, विमा व शासकीय परवानगीसाठी असलेले सर्व प्रकारचे शुल्क इत्यादीसहीत आहेत हे गृहित धरले जाईल.

४. मंडप कंत्राटदाराने काम असमाधानकारक किंवा कामामध्ये विद्यापीठाची गैरसोय झाली आहे असे विद्यापीठाच्या मंडप/ व्यासपीठ समितीच्या निदर्धनास आल्यास कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करुन नियमाप्रमाणे त्याला देय असलेल्या रकमेतुन दंडाची रक्कम रु. 0.50 लक्ष कपात करण्यात येईल.

५. मंडप कंत्राटदाराने मंडप ताब्यात दिल्यावर त्या परिसरात इतरत्र पडलेले कापड, काठया, बांबुचे तुकडे, इतर गोष्टी नेमून दिलेल्या ठिकाणी व्यवस्थीत गोळा करुन ठेवुन परिसर स्वच्छ ठेवने आवश्यक आहे.

६. मंडप कंत्राटदारास कोणत्याही कारणास्तव, कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई किंवा मुदतवाढ देण्यात येणार नाही.

७. मंडप उभारणीचे काम हे काम सुरु करण्याचे आदेश दिल्यापासुन सलग 3 दिवसांत पुर्ण करावे.

८. मंडप उभारणी कामासाठी दर्शविलेल्या बाबींचे परिमाण दिलेले परिमाण ढोबळ मानाने दिले असुन आवश्यकतेनुसार फेरफार करण्यात येतील व त्यानुसार कंत्राटदारास काम समाधानकारकरित्या पुर्ण करावे लागेल. विद्यापीठाने स्विकारलेले दर हे अंतिम राहतील व कामाचे परिमाणात बदल झाल्यास देयकाची रक्कम कमी किंवा जास्त होऊ शकेल परंतु कंत्राटदारास मान्य केलेल्या दरपत्रकानुसारच काम करावे लागेल.

९. समारोहाची सर्वकामे/मंडप पुर्ण करुन मंडप समितीच्या ताब्यात दिनांक 27.10.2021 रोजी सायंकाळी ५.०० वाजता द्यावी लागतील.

१०. कामांची, जागेची व परिस्थितीची पहाणी करुन दर सादर केले आहेत, हे गृहित धरण्यात येईल व कोणत्याही कारणास्तव कोणताही दर/रक्कम वाढीचा दावा मान्य करता येणार नाही.

११. वरील सर्व अटी, कामाचा तपथिल, प्रत्यक्ष परिस्थिती हया कंत्राटदाराने काळजीपुर्वक वाचल्या असुन त्या त्याला समजल्या आहेत /मान्य आहेत हया अटींस अनुसरुनच येणा–या सर्व बाबी लक्षात घेऊनच कंत्राटदाराने दर सादर करावेत.

१२. वरील सुचना व्यतिरीक्त विद्यापीठाच्या मंडप समितीने वेळोवेळी दिलेल्या सुचनांची मंडप कंत्राटदार योग्यप्रकारे अंमलबजावणी करेल व त्यात कुठलीही कसर ठेऊ नये.

१३. काम करताना कंत्राटदाराच्या कर्मचा–यास काही इजा झाल्यास अथवा कर्मचारी दगावल्यास याची सर्व जबाबदारी ही कंत्राटदाराची राहील व त्यास विद्यापीठ कोणत्याही परिस्थितीत जबाबदार राहणार नाही.

१४. अपुर्ण असलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही. सर्व बाबींच्या एकत्रित निविदेचाच (एकत्रित रक्कमेचा) विचार केला जाईल.

सहाय्यक विद्यापीठ अभियंता
बांधकाम उपविभाग क्र २
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला


35,.docx
E:\Des. Sir\Dikshant - 35 (Conovation) 2021\Dikshant

विद्यापीठ अभियंता
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

१५. विद्युत वायरींगचे/ इलेक्ट्रिकचे काम हे कंत्राटदाराने व्यवस्थित भारतीय वीज नियमानुसार सक्षम परवाना धारणकरणा–या इलेक्ट्रिशियन्स कडुन विद्यापीठाच्या इलेक्ट्रिशियन्स व अभियंता यांच्या सुचनेनुसार करावयाचे आहे. तसेच संबंधित इलेक्ट्रिकल वायरींग इ. सर्व गोष्टी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, लि. उपविभागीय कार्यालय, अकोला तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग व पोलिस खात्यांचे नियमानुसार करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असेल. संबंधीत विभागाकडुन आवश्यक त्या सर्व मान्यता संबंधीत कंत्राटदाराने स्वखर्चाने प्राप्त करवुन घेणे बंधनकारक आहे. दोषपुर्ण विद्युत वायरींगमुळे कुणास काही शॉक लागल्यास/धोका/इजा/हानी/मुत्यु किंवा आग लागल्यास कंत्राटदार हा पुर्णपणे जबाबदार राहील व त्या पोटीची नुकसान भरपाईची/दोष दुरुस्त करावयाची रक्कम कंत्राटदारास पुर्णपणे भरावी लागेल किंवा स्वखर्चाने दोष दुरुस्त करुन द्यावा लागेल किंवा त्याला देय असलेल्या रकमेतुन त्याची वजावट करण्यात येईल.

१६. साऊंड सिस्टिमचे काम दि. 27.10.2021 रोजी सकाळी 11.00 वाजता पुर्ण करण्यात यावे. पी. ए. साऊंड सिस्टिमची प्रत्यक्ष चाचणी दि. 27.10.2021 रोजी देण्यात यावी. व साऊंड सिस्टिम दि. 28.10.2021 ला सकाळी 8.00 वाजता रिहर्सलसाठी व दि. 29.10.2021 ला सकाळी 7.00 वाजता पदवीदान समारंभासाठी अद्यावत ठेवावी.

१७. कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा सर्व दरपत्रके नाकारणे यांचे हंक्क विद्यापीठाने राखुन ठेवले आहेत. तसेच या संबधात कायदेशीर बाबी अकोला न्यायालयाचे अखत्यारीत राहतील.

सही

-------------

मंडप कंत्राटदार अकोला

सहाय्यक विद्यापीठ अभियंता
बांधकाम उपविभाग क्र २
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

विद्यापीठ अभियंता
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

मंडप कंत्राटदाराचे नांव/ पत्ता --------------------
--------------------
--------------------
--------------------

मोबाईल नंबर/फोन नंबर --------------------

## भाग २ – आर्थिक भाग

१. दीक्षांत समारोहासाठींचे पुर्ण काम हे आपण जबाबदारीने व आत्मियतेने पुर्ण करावे. ज्या कंत्राटदारास काम देण्यात आले आहे त्यांचेकडुन रु. २०,०००/– (अक्षरी रुपये वीसहजार फक्त) इतकी रक्कम सुरक्षा अनामत रक्कम ठेव घेण्यात येईल. सदरचीं अनामत रक्कम विद्यापीठाने दिलेल्या मुदतीत भरावीं, त्यानंतरच कंत्राटदारास कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) देण्यात येईल. संपुर्ण काम समाधानकारकरित्या व विहीत मुदतीत कंत्राटदाराने पुर्ण न केल्यास सदरचीं सुरक्षा अनामत रक्कम ही पुर्णपणे जप्त करण्यात येईल.

२. सदरच्या सुरक्षा अनामत रकमेवर कोणत्याहीं प्रकारचे व्याज देय असणार नाहीं.

३. सदरचीं सुरक्षा अनामत रक्कम हीं कंत्राटदारास संपुर्ण काम समाधानकारकरित्या व विहीत मुदतीत व करारातील तरतुदींनुसार पुर्ण केल्या नंतरच तसेच कामाचे देयकाचे भुगतान केल्यानंतर ३ महिन्यानंतरच्या कालवधीं नंतर परत करण्यात येईल.

४. समारंभ आटोपल्यानंतर कंत्राटदाराने कमाल ३ (तीन) दिवसांत संपुर्ण परिसर पुर्ववत स्वच्छ करुन द्यावा.

५. दिक्षांत समारंभाकरीता ऐनवेळी काही ठिकाणी शासकीय खात्याच्या/शासनाचे सुचनेनुसार काही बदल अथवा अतिरीक्त कामे करावीं लागल्यास कंत्राटदाराने सदरचीं कामे विनाविलंब व विनामोबदला करुन द्यायचीं आहेत. याचीं नोंद घ्यावीं.

------------

सही
मंडप कंत्राटदार

सहाय्यक विद्यापीठ अभियंता
बांधकाम उपविभाग क्र २
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

विद्यापीठ अभियंता
डॉ. पं.दे.कृ.वि.,अकोला

मंडप कंत्राटदाराचे नांव/ पत्ता ------------------
------------------
------------------
------------------

मोबाईल नंबर/फोन नंबर ------------------

C-17



# सिलबंद निविदा सादर करते वेळी लागू असलेले अनिवार्य दस्ताऐवज

**लिफाफा क्र. 1 मधील कागदपत्रे खालीलप्रमाणे असावीत.**

1. बयाणा रक्कम रु. १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) विद्यापीठ अभियंता, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे. नावे राष्ट्रीयकृत बॅक शाखेकडील अथवा शेडुल बॅकेचे 6 महिने कालावधी करिताचा एफ.डी. आर.
2. PAN/TAN च्या सत्यप्रती.
3. कंत्राटदाराचे GST रजिस्ट्रेशन सर्टिफीकेट.
4. Profetional Tax रजिस्ट्रेशन सर्टिफीकेट.
5. 1 वर्षाचे (निविदा रकमेच्या 75%) चे वार्षिक उलाढाल सर्टिफीकेट (Turnover Certificate) चार्टड अकाउंटन्ट (C. A.) कडुन सर्टिफीकेट केलेले.
6. मागील 3 वर्षाचे समप्रकारचे काम केल्याचे (निविदेच्या रकमे एवढे) कार्यकारी अभियंता व तत्सम स्तरावरील अधिका–याने सर्टिफाईड केलेले सर्टिफीकेट.

**लिफाफा क्र. 2 मधील कागदपत्रे खालीलप्रमाणे असावीत.**

१. कार्यालयाने पुरविलेली कोरे निविदा दरपत्रक दर भरुन लिफाफा क्र. २ मध्ये सादर करावे.
लिफाफा क्र. १ प्रथम उघडण्यात येईल. त्यातील सर्व कागदपत्रांची पुर्तता असेल तरच लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| सहाय्यक विद्यापीठ अभियंता<br>बांधकाम उप-विभाग क्र.२<br>डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला | विद्यापीठ अभियंता<br>डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला | दरपत्रक भरणा-याची<br>स्वांक्षरी |

C-19



# घोषणापत्र

1. दरपत्रकामधील करावयाच्या कामांच्या बार्बीची संपुर्ण माहीती व त्याबाबत पाळावयाची सुरक्षा याची माहिती मला आहे.
2. दरपत्रकामधील सोबत जोडलेली माहीती खोटी आढळल्यास मी/आम्ही कायद्यानुसार होणा–या शिक्षेस पात्र राहील.
3. दिक्षांत समारोहासाठीचे निविदेमधील सर्व कामे दरपत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे दि. 27.10.2021 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत पुर्ण करुन मंडप समितीच्या ताब्यात देईल अन्यथा/ आम्ही रु. 2000/– (रुपये दोन हजार फक्त) प्रतितास दंडास पात्र होईल या बाबत मी/आम्ही सर्वसाधारण व विशेष शर्ती/अटी काळजीपुर्वक वाचल्या आहेत व त्या मला/आम्हास बंधनकारक आहेत हे मान्य आहे.
4. काम असमाधानकारकरित्या झाल्यास किंवा विद्यापीठाची गैरसोय झाली असे मंडप/व्यासपीठ समितीच्या निदर्शनास आल्यास, मला/आम्हाला देय असलेल्या रकमेमधुन दंडापोटी रु. 0.50 लक्ष एवढी रक्कम कपात करण्यात येईल ही अट मला/आम्हास बंधनकारक आहे, हे मान्य आहे.

-----------------

ठिकाण : -------- दरपत्रक भरणा–याची सही

दिनांक : --------

दरपत्रक भरणारांचे नांव व पत्ता ------------------
------------------
------------------

मोबाईल नंबर/ फोन नंबर ------------------

थिक्का

सहाय्यक विद्यापीठ अभियंता
बांधकाम उपविभाग क्र २
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

विद्यापीठ अभियंता
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

कामाचे नाव :– डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथे 35 व्या दिक्षांत समारोहाकरिता कार्यक्रमस्थळी तात्पुरत्या स्वरुपात खुर्ची, कनाती, मॅटींग, इ. व्यवस्थेसह इतर आवश्यक बाबी पुरविणे

कोरे विवरण दर पत्रक

| अ.क्र. | विवरण | परिमाण | दर अंकात रुपये | दर अक्षरी रुपये | एकक | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **बाब** क्र.१) प्रभारी अभियंता यांनी सुचित केल्या नुसार पदवीदांन समारंभ हॉल मधील स्टेज साईज (120 फुट x 30 फुट) वर मजबुत सरळबल्ली व सुशोभित व नविन पांढ–या कापडाचा उपयोग करुन छताच्या उंचीपर्यंत सिलींग पार्टीशन वॉल आतील दारे इ. सह मंडप उभारणे. | 3750.00 | | | चौ.फु. | |
| 2 | **बाब क्र.2**) प्रभारी अभियंता यांनी सुचित केल्यानुसार दर्शवीलेल्या जागीं मजबुत सरळबल्ली व सुशोभीत रंगीत पांढ–या कापडाचा उपयोग करुन स्टेजवरील छताच्या उचीपर्यत मंडप उभारणे. | 1350.00 | | | चौ.फु. | |
| 3 | **बाब क्र.3)** प्रभारी अभियंता यांचे सुचनेनुसार मंडपात, स्टेजवर, व्हीं. आय.पीं. मंडपात चटई आथरणे (दोन दिवसाकरीता) | 14600.00 | | | चौ.फु. | |
| 4 | बाब क्र.4) प्रभारी अभियंता यांचे सुचनेनुसार मंडपात, स्टेजवर, मंडपात व्ही.आय.पी. फायबर खुर्च्या स्वच्छ करुन निर्देशानुसार रांगेत लावणे. (दोन दिवसाकरीता) | 600.00 | | | नग | |
| 5 | बाब क्र.5) प्रभारी अभियंता यांचे सुचनेनुसार सुशोभीत कनात (गोल्डन/सिल्कहोम) उभारणे (दोन दिवसाकरीता) | 15405.00 | | | चौ.फु. | |
| 6 | बाब क्र.6) प्रभारी अभियंता यांचे सुचनेनुसार मंडपात, सुशोभीत स्वागत कमान दार उभारणे (दोन दिवसाकरीता) | 5.00 | | | नग | |
| 7 | बाब क्र.7) प्रभारी अभियंता यांचे सुचनेनुसार आवश्यक ठिकाणी मंडपाच्या दरवाज्यांना/खिडक्याना सुशोभीत पडदे लावणे (दोन | 14.00 | | | नग | |

C-21

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 8 | **बाब क्र.8)** प्रभारी अभियंता यांचे सुचनेनुसार लोखडी पत्र विद्युत कंट्रोल रुम उभारणे (दोन दिवसाकरीता) | 100.00 | | | चौ.फु. | |
| 9 | **बाब क्र.9)** प्रभारी अभियंता यांचे सुचनेनुसार मुख्य स्टेजवर दोन्ही बाजुला आवश्यकते नुसार श्लोक फलक लावण्याकरीता 8 फुट X 8 फुट आकारात प्लॉयवुड फ्रेमसहित व्यवस्था करणे. | 64.00 | | | चौ.फु. | |
| 10 | बाब क्र.10) प्रभारी अभियंता यांचे सुचनेनुसार आवश्यक त्या ठिकाणी सुरक्षा कठडे उभारणे 4 फुट उंचीचे | 400.00 | | | रनिग फु. | |
| 11 | **बाब क्र.11)** प्रभारी अभियंता यांचे सुचनेनुसार आवश्यक ठिकाणी स्त्री व पुरुषांची प्रसाधनगृहे उभारणे (दोन दिवसाकरीता) ( स 15'' X 15'') | 4.00 | | | नग | |
| 12 | **बाब क्र.12)** प्रभारी अभियंता यांचे सुचनेनुसार पदविदान समारंभासाठी येणा–या अतिथींसाठी विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेसाठी थंड व शुध्द आर ओ वॉटर कॅन 30 लिटर क्षमतेच्या पुरविणे डिस्पोजल ग्लास सह पाणी वाटप करणे पाणी वाटपासाठी पुरेसे मनुष्यबळ विशिष्ट ड्रेसकोड सह ठेवणे. (दोन दिवसाकरीता) | 1000.00 | | | लिटर | |
| 13 | **बाब क्र.13)** प्रभारी अभियंता यांचे सुचनेनुसार मंडपाबाहेर, मंडपात लाल मॅटींग आंथरणे (दोन दिवसाकरीता) | 8100.00 | | | चौ.फु. | |
| 14 | बाब क्र.14) प्रभारी अभियंता यांचे सुचनेनुसार आवश्यक त्या ठिकाणी डेकोरेटीव्ह थ्री सीटर सोफासेटस पुरवींणे (दोन दिवसाकरीता) | 20.00 | | | नग | |
| 15 | **बाब क्र.15)** प्रभारी अभियंता यांचे सुचनेनुसार पाण्यासाठी ॲल्युमिनीयमच्या बकेट पुरवींणे (दोन दिवसाकरीता) | 5.00 | | | नग | |
| 16 | **बाब क्र.16)** प्रभारी अभियंता यांचे सुचनेनुसार पिण्याचे पाणी नेण्याकरीता ग्लास स्टॅन्ड पुरवींणे (दोन दिवसाकरीता) | 5.00 | | | नग | |

C-23

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 17 | **बाब क्र.17)** प्रभारी अभियंता यांचे सुचनेनुसार पाणी पिण्या करीता स्टेनलेस स्टिलचे ग्लास पुरवीणे (दोन दिवसाकरीता) | 20.00 | | | नग | |
| 18 | **बाब क्र.18)** प्रभारी अभियंता यांचे सुचनेनुसार पाणी पिण्या करीता स्टेनलेस स्टिलचे जग पुरवीणे (दोन दिवसाकरीता) | 5.00 | | | नग | |
| | | | | | एकुण रु. | |

(अक्षरी रु. -----------------------------------------------------)

कंत्राटदाराची सही

टिप : 1. कंत्राटदाराने संपुर्ण मंडप पावसापासुन संरक्षण करण्यासाठी त्यांचे स्व खर्चाने जलरोधक करणे आवश्यक राहील. यासाठी वेगळे पेमेन्ट मिळणार नाही.

2. मंडपाचे अग्नीपासुन संरक्षण करण्यासाठी मंडपात व मंडपाबाहेर विद्यापीठ अभियंता यांचे सुचनेनुसार आवश्यक ठिकाणी Fire Extinguisher ची व्यवस्था स्व खर्चाने करणे आवश्यक राहील. यासाठी वेगळे पेमेन्ट मिळणार नाही

3. तसेच वारा, वादळ पाऊस यामध्ये मंडप कोसळु नये किंवा हवेत उडून जाऊ नये यासाठी आवश्यक ती मजबुती मंडप उभारतांना करणे आवश्यक राहील. यासाठी वेगळे पेमेन्ट मिळणार नाही.

C-25

शाखा अभियंता,
बांधकाम उपविभाग क. 2,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

उपअभियंता,
बांधकाम उपविभाग क.2,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.

विद्यापीठ अभियंता
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

कंत्राटदाराची स्वाक्षरी